**<u>नियमित दिवाणी दावा क्र.१५/२०१२</u>**

(आनंदराव बाबुराव पाटील वि. राजाराम बाबुराव पाटील व.)

## <u>निशाणी क्र. १३७ खालील आदेश</u>

(पारित दिनांक – २०/०२/२०२४)

वादीतर्फे सदरचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६ नियम १७ अन्वये दुरुस्ती करणेकरीता दाखल केला आहे. प्रस्तुतचा दावा वादीने दावा मिळकतीतील तिचा हिस्सा सरसनिरस मानाने वाटप करुन मिळणेसाठी केला आहे. सदर दाव्यात प्रतिवादींची कैफियत व वादीचा सरतपास दाखल आहे. प्रतिवादी हे आडदांड असून, त्यांनी संगनमताने प्रतिवादी क्र.२ ने दि.२०/१०/२०२२ रोजी दावा कलम १ (७) गट नं.६११ मधील हिस्सा नोंदीचे आधारे श्री. सुहेल मुबारक मुल्ला यास मुदत खरेदीचा दस्त करुन दिलेचे वादीचे निदर्शनास आले आहे.

२. पुढे वादीचे असे कथन केले की, नि.१२५ अन्वये प्रतिवादीविरुध्द स्टेटस को आदेश असतांना, न्यायालयाचे आदेशाचा अवमान करुन प्रतिवादी क्र.२ याने १ (१) गट नं.३०५ मधील हिस्सा राजेंद्र विलास महारुगडे यास दि.०४/०९/२०२३ रोजी रजि.खरेदीपत्राने हस्तांतर केला. सदर खरेदीपत्र बेकायदेशीर असून, खरेदीदार यास सदर मिळकतीत कसलीही मालकी, हक्क, संबंध अगर वहिवाट नाही. सदरची परिस्थिती अभिलेखावर येणेसाठी दाव्याचे सरनाम्यात प्रतिवादी क्र.६ चे नावानंतर, प्रतिवादी क्र.७ श्री.राजेंद्र विलास महारुगडे, ८. श्री.सुहेल मुबारक मुल्ला यांची नावे समाविष्ट करावी. तसेच दाव्याचे कलम १० नंतर प्रस्तुत अर्जात नमुद ''१०अ व १०ब'' मधील मजकुर समाविष्ट करावा. तसेच दावा कलम १२ नंतर प्रस्तुत अर्जात नमुद ''१२अ'' मधील मजकुर तसेच कलम १७ मध्ये इ नंतर ''इ-१'' म्हणून प्रस्तुत अर्जातील नमुद परिच्छेदातील मजकुर समाविष्ट करुन, त्याप्रमाणे दुरुस्ती करणेकरीता प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे. सदर दुरुस्तीमुळे दाव्याचे मुळ स्वरुपात बदल होत नाही. वादीने वरीलप्रमाणे दाव्यात दुरुस्ती होणेची विनंती केली आहे.

३. प्रतिवादी यांनी सदर अर्जावर म्हणणे दाखल करुन, तीव्र आक्षेप नोंदविला.

४. वादी व प्रतिवादी यांचे वकिलांचा युक्तिवाद ऐकला. सदर दावा दुरुस्तीमुळे मुळ दाव्याचे स्वरुप बदलत नाही. तसेच सदर दावा दुरुस्ती ही दाव्याचा गुणदोषावर निकाल देणेकामी गरजेची आहे. प्रस्तावित दुरुस्तीमुळे प्रतिवादींचे काही नुकसान होणार नाही व दाव्याचे मुळ स्वरुपात कोणताही बदल होणार नाही. सदरची दावा दुरुस्ती न्यायाच्या दृष्टीने आवश्यक

असल्यामुळे प्रस्तुत अर्ज मंजुर करणे योग्य व उचित होईल. या सर्व बाबी विचारात घेता, खालीलप्रमाणे आदेश करीत आहे.

<u>आदेश</u>

१. अर्ज (नि.१३७) र.रु.५००/- खर्चासह मंजूर करणेत येतो. खर्चाची रक्कम वादीने प्रतिवादी दयावी.

२. वादीने कायदेशीर मुदतीत दुरुस्ती करावी व दुरुस्त प्रत अभिलेखावर सादर करावी.

ठिकाण– कराड (श्रीमती पी.एस.भोसले)

दिनांक– २०/०२/२०२४ ३रे सहदिवाणी न्यायाधीश क.स्तर, कराड.